# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensational crime**

**Police Station** :- **Washim City**

**Date of Good Work done** :- **10/05/2023**

**Brief of the work done :-**

पैश्याच्या वादातून मित्राची हत्या करणाऱ्या आरोपीस 02 तासांत तर सहआरोपीस 12 तासांत अटक ; पो.स्टे. वाशिम शहर पोलीस पथकाची कामगिरी.

**महत्त्वाचे...**

## दोन तासात खुनातील मुख्य आरोपी तर १२ तासात दुसरा आरोपी जेरबंद

**पब्लिक पोस्ट प्रतिनिधी**

**वाशीम, ता. १०:** दि. ८ मे रोजी रात्री ७:३० वाजेदरम्यात शहरात आकाश अरुण कोठेकर वय २३ वर्ष रा. ध्रुर्व चौक वाशीम या युवकांचा धार-दार शस्त्राने गळा चिरून खुन झाला. या खुनाच्या घटनेमुळे वाशिम शहरासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती.




त्यामुळे आरोपी शोधण्याचे पोलिसा समोर एक मोठं आवाहन सुद्धा उभे होते. दरम्यान सायबर सेल च्या मदतीने शहर पोलीसांकडून आरोपीचा मोबाईल लोकेशन ट्रेस करून त्याची शोध मोहिम राबवण्यात आली. अखेर दोन तासाच्या आत अथक परिश्रमानंतर खुनातील मुख्य आरोपी आकाश जिरवणकर याला अवघ्या दोन तासात तर दुसरा आरोपी पवन चिंतामण जोरावार वय १९ वर्ष (रा. हिंगोली ) ह. मु.ध्रुर्व चौक वाशीम याला १२ तासात पकडून जेरबंद करण्यात शहर पोलिसांना यश आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम शहर पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक शेख रफीक , लालमणी श्रीवास्तव, रामकृष्ण नागरे, ज्ञानदेव मात्रे, विठ्ठल महल्ले, अनिल बोरकर, संदीप वाकुडकर सायबर सेलचे दिपक घुगे यानी उत्कृष्ट कामगिरी करीत आरोपीला जेरबंद केले.पोलिसांच्या कामगिरीने सदर खुनाच्या घटनेने शहरात अशांतता पसरवीनाऱ्या वृत्तीला आळा बसला असून जिल्ह्यात पोलीस दलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.